प्रेसनोट दिनांक १९/०७/२०१९.

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## वाहनचोरीच्या गुन्हयातील चोरटा जेरबंद

तक्रारदार श्री समिर शिवाजी गायकवाड, वय ४५ वर्षे, रा. ४६९ सदाशिव पेठ पुणे यांची रिक्षा क्रमांक एम एच १२ क्यु आर ११४५ ही १,५०,०००/- रु. किंमतीची रिक्षा त्यांनी दिनांक २५/०५/२०१९ रोजी रात्रौ २०.०० ते दिनांक २६/०५/२०१९ रोजी सकाळी ०९.३० वा. चे दरम्यान राहते घराजवळ उभी करुन ठेवलेली असतांना ती अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन विश्रामबाग पो स्टे, गु.र.नं.२२३/२०१९, भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

दिनांक १६/०७/२०१९ रोजी मा.पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहायक पोलीस आयुक्त श्री सुधाकर यादव सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल कलगुटकर सो, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री दादासाहेब चुडाप्पा सो, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री विजय जाधव, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई प्रशांत शिंदे असे वाहनचोरीचे गुन्हयासंदर्भात पेट्रोलिंग फिरत असतांना इंदुलाल कॉम्प्लेक्स शास्त्री रोड, पुणे याठिकाणी एक संशयित इसम तेथील वाहनांचे आजुबाजुला संशयास्पदरित्या वावरतांना आढळुन आला त्यास वरील पोलीस पथकाने ताब्यात घेवून त्याचेकडे सखोल विचारपुस करता त्याने त्याचे नाव गणेश महापती कुडले, वय २७ वर्षे, रा. कात्रज कोंढवा रोड पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे अधिक विचारपुस करता त्याने वरनमुद दाखल असलेल्या गुन्हयातील रिक्षा क्रमांक एम एच १२ क्यु आर ११४५ ही चोरल्याचे कबुल केलेले असुन अशा प्रकारे त्याचेकडुन वरनमुद रिक्षा चोरी संदर्भातील वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

( सुनिल कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर